**ठळक बातम्या**

- गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- स्टेट बँक कर्ज फसवणूक प्रकरणी अनिल अंबानी यांच्यावर सीबीआयचे छापे

- बिहारच्या पाटणा इथं झालेल्या अपघातात किमान आठ जण ठार, पाच जण गंभीर जखमी

**आणि**

- जागतिक युवा तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत २१ वर्षाखालच्या भारतीय संघानं पटकावलं जेतेपद

**<><><><><>**

गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे ते आज दुसऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिना निमित्तानं देशाला संबोधित करत होते. गेल्या काही काळांत अंतराळ क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख आणि भविष्यातल्या मोहिमांचा सूतोवाच करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाइट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

'आर्यभट्ट ते गगनयान' ही या वर्षीची या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना असून यात भूतकाळाचा आत्मविश्वास आणि भविष्याचा संकल्प आहे, असं ते म्हणाले. अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडत असून कृषी, मासेमारी, आपत्ती व्यवस्थापन, कनेक्टिव्हिटी इत्यादी

क्षेत्रांमध्ये हे क्षेत्र मोठं योगदान देत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं.गेल्या ११ वर्षांत अंतराळ क्षेत्रात केलेल्या विविध सुधारणांची माहिती त्यांनी दिली. या क्षेत्राची दारं खासगी क्षेत्रासाठी उघडल्यामुळे सध्या ३५० स्टार्टअप्स या क्षेत्रात काम करत आहेत, असं मोदी म्हणाले. पुढच्या ५ वर्षांत अंतराळ क्षेत्रातले ५ युनिकॉर्न उभारायचं आणि प्रत्येक वर्षी ५० रॉकेट्सचं प्रक्षेपण करायचं ध्येय ठेवावं, असं त्यांनी सुचवलं. त्यासाठी या क्षेत्रात अत्याधुनिक सुधारणांची गरज असून त्या करायचा सरकारचा उद्देश आणि इच्छाशक्ती आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथल्या भारतीय कृषी संशोधन परिषदेत राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात करतील. केंद्रीय मंत्रीमंडळानं गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये केंद्र प्रायोजित योजना म्हणून या अभियानाला मान्यता दिली होती.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापार विषयक वाटाघाटी अद्याप सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं एका खासगी कार्यक्रमात बोलत होते. देशातले शेतकरी आणि लघु उत्पादकांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

कोणत्याही देशाबरोबर मुक्त व्यापार कराराबाबतच्या वाटाघाटी करताना, राष्ट्रीय हित आणि भारतीय उद्योगांना पहिलं प्राधान्य दिलं जाईल, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल मुंबईत एका खासगी कार्यक्रमात बोलत होते. भारत युरोपीय संघाच्या नियमितपणे संपर्कात

असून, आणखी तीन ते चार व्यापार करारांवर चर्चा सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली. जागतिक परिस्थितीकडे भारताचं बारकाईनं लक्ष असून, पारदर्शक संबंध ठेवता येतील, अशा भागीदारांबरोबर सक्रीय पद्धतीनं काम करत असल्याचंही गोयल यांनी सांगितलं.

**<><><><>**

जीएसटी परिषदेची ५६वी बैठक येत्या ३ आणि ४ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. जीएसटीमधला १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा हटवण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरच्या भाषणात यासंबंधीचे संकेत दिले होते.

**<><><><>**

सीबीआयनं आज अनिल अंबानी यांच्या मालकीचं रिलायन्स कम्युनिकेशन आणि त्यांच्या संचालकांच्या घरी छापे टाकले. स्टेट बँकेकडून कर्ज घेऊन २ हजार कोटींचा घोटाळा केल्याप्रकरणी मुंबईत विविध ठिकाणी हे छापे पडले. १३ जून रोजी स्टेट बँकेनं रिलायन्स कम्युनिकेशनला दिलेलं कर्ज 'फसवणूक' या श्रेणीत वर्ग केलं होतं. १७ हजार कोटींच्या कर्ज घोटाळा प्रकरणी काही दिवसांपूर्वी ईडीनं अनिल अंबानी यांचं कार्यालय आणि इतर ठिकाणी छापे टाकून काही वस्तू जप्त केल्या होत्या, तसंच त्यांची चौकशी केली होती.

**<><><><>**

बिहारमधे पाटणा इथं आज सकाळी झालेल्या अपघातात आठ जण मृत्यूमुखी पडले, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. दानियावान इथल्या राज्य महामार्गावर ऑटोरिक्षाला ट्रकनं जोरदार धडक दिल्यानं हा अपघात झाला. अपघातातल्या जखमींना पाटणा इथल्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><>**

पंजाबमधे होशियारपूर इथं काल मध्यरात्री एका एलपीजी टँकरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोन जणांचा मृत्यू झाला, तर २३ जण गंभीर जखमी झाले. जखमींना होशियारपूरच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून १५ जणांना विशेष रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये, चामोली जिल्ह्यात काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे थरली तालुक्यात मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. थरली तालुका मुख्यालय, केदारबागड, राडीबागड आणि चेपाडोसह अनेक भागांना जोरदार पावसाचा फटका बसला आहे. निवासी इमारती, दुकानं आणि सरकारी कार्यालयांमध्ये पावसाच्या पाण्याबरोबर आलेला राडारोडा साचला आहे. अनेक वाहनांचंही नुकसान झालं आहे. विविध यंत्रणा मदत आणि बचावकार्यात गुंतल्या आहेत. दरम्यान, उत्तराखंडमध्ये सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असून, हवामान विभागानं डेहराडून, नैनिताल, बागेश्वर आणि पिठोरागडला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्जिओ गोर यांची अमेरिकेचे भारतातले नवे राजदूत म्हणून नियुक्ती केली आहे. दक्षिण आणि मध्य आशियासाठी विशेष दूत म्हणूनही ते काम करतील. अमेरिकेला पुन्हा महान करण्याचं आपलं ध्येय साध्य करण्यासाठी गोर यांच्यासारख्या व्यक्तीची गरज होती, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकन सिलिकॉन व्हॅली मधल्या इंटेल या चिप निर्मिती करणाऱ्या कंपनीने अमेरिकन सरकारला १० टक्के समभाग विकण्याचं मान्य केलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल वॉशिंग्टन इथे वार्ताहरांना ही माहिती दिली.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची कास न धरल्यामुळे कंपनी संकटात असून

अमेरिकन सरकार इंटेलमध्ये ८ अब्ज ९० कोटी डॉलर्सची गुंतवणूक करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. समभाग खरेदीनंतरही अमेरिकन सरकारचा प्रतिनिधी इंटेलच्या संचालक मंडळात नसेल किंवा सरकारला कुठल्याही निर्णयात हस्तक्षेप करता येणार नाही, असं इंटेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी लीप बु टॅन यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व बँकेच्या येत्या सप्टेंबर महिन्यातल्या बैठकीत व्याजदर कपातीची शक्यता असल्याचे संकेत यूएस फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी दिले आहेत. मात्र व्याजदर कपातीची कोणतीही हमी देता येत नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. एका अर्थविषयक परिषदेला ते संबोधित करत होते. अमेरिकेतली महागाईची चिंता तीव्र असली, तरी रोजगाराची परिस्थिती आटोक्यात असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनं गेल्या डिसेंबरमधल्या व्याजदर कपातीनंतर हा दर ४ पूर्णांक २५ शतांश टक्के आणि ४ पूर्णांक ५ दशांश टक्के या दरम्यान कायम ठेवला आहे.

**<><><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलिदिमिर झेलेन्स्की यांच्यात नजीकच्या काळात कुठलीही भेट प्रस्तावित नाही, असं रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी स्पष्ट केलं आहे. झेलेन्स्की यांची भेट घ्यायला पुतीन तयार आहेत, मात्र भेटीचा सविस्तर मसुदा तयार नसल्याचं ते म्हणाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात पुतीन यांच्याबरोबर झालेल्या भेटीत काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यावर लवचिक भूमिका घ्यायची रशियाची तयारी असल्याचंही त्यांनी सांगितलं. दरम्यान, झेलेन्स्की यांनी नाटोचे

महासचिव मार्क रुटे यांची युक्रेनची राजधानी किव्हमध्ये भेट घेतली आणि युक्रेनच्या सुरक्षेची हमी मागितली.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांच्या घरी आणि कार्यालयांवर FBIनं छापे टाकले आहेत. त्यांच्यावर गुप्त माहितीचा दुरुपयोग केल्याचा आरोप आहे. २०१९ मध्ये ट्रम्प यांची साथ सोडल्यानंतर बोल्टन हे ट्रम्प यांचे टीकाकार झाले आहेत. याप्रकरणी बोल्टन यांना ताब्यात घेण्यात आलं नसून त्यांच्यावर कुठलेही गुन्हेगारी स्वरुपाचे आरोपही दाखल नाहीत.

**<><><><><>**

कॅनडामध्ये सुरू असलेल्या जागतिक युवा तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत २१ वर्षांखालच्या भारतीय संघानं जेतेपद पटकावलं. कुशल दलाल, मिहिर अपार आणि गणेश मणी रत्नम यांनी कंपाऊंड प्रकारात जर्मनीच्या संघाला नमवून सुवर्णपदकाची कमाई केली. या स्पर्धेत १८ वर्षांखालच्या भारतीय संघानं अमेरिकेला नमवून कॅडेट अजिंक्यपदक पटकावलं. मोहित डागर, योगेश जोशी आणि देवांश सिंग यांचा या संघात समावेश होता.

**<><><><><>**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये गिलगिट-बाल्टिस्तानच्या घिझर जिल्ह्यात हिमनदी फुटल्यामुळे महापूर आला असून, भूस्खलन झाल्यामुळे  ३०० पेक्षा जास्त घरं आणि दुकानं उद्ध्वस्त झाली आहेत. या भागातला मोठा भूप्रदेश पुराच्या पाण्याखाली आल्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. बचाव पथकांनी आतापर्यंत २०० पेक्षा जास्त नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवल्याचं वृत्त आहे.

**//<><><><><>//**